06 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सन्मान शाळांचा...



कोल्हापूर : 'तरुण भारत संवाद'च्या वतीने माझी शाळा, सुंदर शाळा अभियानातील विजेत्या शाळांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुवर्णा सावंत, 'तरुण भारत संवाद'चे विभागीय संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड, यशवंत अॅकॅडमीचे संचालक विकास काशीद, प्रतिमा काशीद, निवासी संपादक सुधाकर काशीद, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक शशिकांत बडे, मनपाचे प्रशासनाधिकारी डी. सी. कुंभार, विज्ञान निरीक्षक जयश्री जाधव, वरिष्ठ वितरण व्यवस्थापक अमर पाटील आदी.

(वृत्त पान ५ वर)

06 DEC 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनी निसर्गभान जपणारे शिक्षण देण्याची गरज

## डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन 'तरुण भारत संवाद' आणि यशवंत अकॅडमीच्यावतीने 'माझी शाळा सुंदर शाळा' अभियानातील विजेत्यांचा सन्मान

**वस्त्र, निवारा या आवश्यक गरजा आहेत. तर हवा आणि पाणी या मूलभूत गरजा आहेत. या मुलभूत गरजा मोफत मिळतात. पण मानवाकडून स्वतःच्या स्वार्थासाठी मूलभूत गरजांचाच विध्वंस केला जात आहे. यामुळे शाळा सुंदर घडवणाऱ्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये निसर्गभान जपणारे आणि वाढवणारे शिक्षण द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. तरुण भारत संवाद च्यावतीने माझी शाळा, सुंदर शाळा विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठातील शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला. याचे यशवंत अकॅडमी कार्यक्रमाचे प्रायोजक होते.**

◆ प्रतिनिधी, कोल्हापूर

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानात कोल्हापूर जिल्ह्यातील ७९ शाळांची निवड झाली आहे. या शाळांनी परिसर सौंदर्यीकरण, स्वच्छता, डिजिटल वर्ग, परसबाग, गुणवत्ता विकास आणि विविध शालोपयोगी उपक्रम राबवले आहेत. या शाळांच्या उल्लेखनीय कामगिरीचा तरुण भारत संवादने गौरव केला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, सरपंच यांना सन्मानपत्र देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी सुवर्णा सावंत, 'तरुण भारत संवाद'चे विभागीय संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड, यशवंत अकॅडमीचे संचालक विकास काशीद, प्रतिमा काशीद, निवासी संपादक सुधाकर काशीद, उपशिक्षणाधिकारी शशिकांत बडे, मनपाचे शिक्षणाधिकारी डी. सी. कुंभार, जयश्री जाधव, वरिष्ठ वितरण व्यवस्थापक अमर पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, शिक्षण हा जिव्हाळ्याचा विषय आहे. कारण शिक्षणामुळे परिवर्तन घडते. शिक्षणामुळेच आज मी कुलसचिव या पदापर्यंत पोहोचलो आहे. यामुळे तरुण भारत संवाद आणि यशवंत अकॅडमीच्यावतीने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे कौतुक आहे. पण आज शिक्षकांवर मोठी जबाबदारी आहे. विविध उपक्रमांतून आपल्या शाळा सुंदर बनवणाऱ्या शिक्षकांचे कौतुक आहे. पण आता विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाचे बीज रुजवण्याचे काम शिक्षकांनी केले पाहिजे. लोकांची मानसिकता विचित्र झाली आहे असे सांगत त्यांनी मोबाईलमुळे लोक निसर्गाचा पुरेपूर आनंद घेऊ शकत नाहीत. कारण निसर्ग पाहण्यापेक्षा त्याचे मोबाईलवर फोटो काढून त्याला लाईक किती मिळतात यामध्ये माणूस आनंद शोधत आहे. सोशल मीडियाचा वापर चांगल्या कामासाठी व्हायला हवा. शाळेत वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा शिकवल्या जातात. पण या मूलभूत नव्हे तर आवश्यक गरजा आहेत. हवा आणि पाणी या मूलभूत गरजा असून माणसाकडून त्याचा विध्वंस सुरु आहे. आजच्या परिस्थितीत मुलांमध्ये निसर्ग आणि पर्यावरण जपणारे शिक्षण देण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे.




कोल्हापूर : तरुण भारत संवादच्यावतीने माझी शाळा, सुंदर शाळा अभियानातील [illegible] शाळांचा सन्मान करण्यात आला. वृक्षाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरुवात करताना यशवंत अकॅडमीचे संस्थापक संचालक प्रा. विकास काशीद. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, सुवर्णा सावंत, डॉ. श्रीरंग गायकवाड, प्रतिमा काशीद, शशिकांत बडे, सुधाकर काशीद, डी. सी. कुंभार, जयश्री जाधव. दुसऱ्या छायाचित्रात राजर्षी शाहू सभागृहामध्ये उपस्थित असलेले शिक्षक आणि सरपंच.

### 'तरुण भारत'ला १०७ वर्षांचा इतिहास : डॉ. गायकवाड

▪ प्रास्ताविकात 'तरुण भारत संवाद'चे विभागीय संपादक म्हणाले, तरुण भारतला १०७ वर्षांचा इतिहास आहे. सीमालढ्यातील हे अग्रगण्य दैनिक आहे. तरुण भारत संवादकडून शिक्षण आणि समाजप्रबोधनाचे कार्य होते. याचाच एक भाग म्हणून आज माझी शाळा, सुंदर शाळा अभियानातील यश मिळवलेल्या शाळांचा तरुण भारत संवादच्यावतीने सन्मान करण्यात येत आहे.

### कोल्हापूरची वाटचाल मराठवाड्याच्या दिशेने

▪ कोल्हापूरला निसर्गाचे वरदान मिळाले आहे. पण ते पुढील पिढ्यासाठी शालेय शिक्षणातून निसर्गाची माहिती द्यायला हवी. कारण शालेय वयातच मुलांवर संस्कार घडून दिशा मिळते. पण सद्यस्थिती बघितली तर कोल्हापूर जिल्ह्यात बोअरवेल मारण्याचा सपाटा सुरु आहे. यामुळे कोल्हापूरची वाटचाल मराठवाड्याच्या दिशेने सुरु असल्याची खंत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केली.



कोल्हापूर : मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत अब्दुललाट येथील न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने विभाग स्तरावर दुसरा क्रमांक पटकावला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिक्षकांना मानपत्र देण्यात आले.

यशवंत अकॅडमीचे संस्थापक संचालक विकास काशीद म्हणाले, माझी शाळा, सुंदर शाळा अभियानातील काम कौतुकास्पद आहे. कारण शिक्षकांना अशैक्षणिक कामे लावली जातात. या कामातून त्यांनी हे यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या हृदयापर्यंत शिक्षकच पोहोचू शकतात. शिक्षकांकडून सुजाण नागरिक घडतील.

प्रशासनाधिकारी डी. सी. कुंभार म्हणाले, 'तरुण भारत संवाद'ने राबवलेला हा उपक्रम स्तुत्य आहे. तिसऱ्या टप्प्यात आता ५ कोटी रुपयांचे बक्षीस मिळवून देतील. उपशिक्षणाधिकारी प्राथमिक शशिकांत बडे यांनी हा उपक्रम प्रोत्साहन देणारा आहे. पुढील वर्षी ही संख्या अजून वाढेल यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

विज्ञान निरीक्षक जयश्री जाधव म्हणाल्या, लोकांच्या सहकार्यामुळे या शाळांनी अभियानात यश मिळवले आहे. आता राज्यपातळीवर यश मिळवण्याचे ध्येय असून अभियानातील तिसऱ्या टप्प्यातील कामाला लागण्याचे आवाहन शिक्षकांना केले. तसेच 'तरुण भारत संवाद'मुळे जिल्हा परिषदेच्या उपक्रमांना प्रसिध्दी मिळत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 DEC 2025 पुढारी

# विद्यापीठाकडून ६५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ६५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी बीए., बी.कॉम., बी.व्होक., बीएड, एमए., पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बीए, बीएड., बीडीएफसी, बॅचलर ऑफ लॉ, डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट आदी १३३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १९७ केंद्रांवर झाल्या. परीक्षेला ७२ हजार ८४७ विद्यार्थी उपस्थित होते. दि. ५ रोजी बीएस्सी., एफटीएम, बी.कॉम., बीए., बीबीए, बीजे., आदी सात अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. भरारी पथकाकडून कोल्हापूर (१०), सातारा (७) अशा १७ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 DEC 2025

जनप्रवास

# क्रांतीबा महात्मा ज्योतिबा फुले यांच्या साहित्याचा नव्याने अभ्यास होणे गरजेचे

● प्रा. डॉ. उमाकांत हत्तीकट



जनप्रवास : कागल

कागल येथील डी. आर. माने महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठमध्ये कार्यरत प्रा. डॉ. उमाकांत हत्तीकट यांचे 'महात्मा ज्योतिबा फुले आणि आजची प्रस्तुतता' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

त्यांनी विषयाची मांडणी करताना महात्मा फुले यांच्या साहित्याचा मागवा घेतला तसेच त्यांचे साहित्य आजच्या सामाजिक परिस्थितीमध्ये कसे लागू पडते, ते सांगितले. तरुण वर्गाने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचाराचा जागर केला पाहिजे. त्यांच्या साहित्याचा नव्याने अभ्यास होणे आवश्यक असल्याचे सांगितले. फुले यांच्या विचाराचा वसा आणि वारसा पुढे छत्रपती शाहू महाराज यांनी चालवल्याचे त्यांनी नमूद केले. प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ. संतोष जेटीथोर यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेऊन हा कार्यक्रम घेण्यामागील उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम हे होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना त्याने आपल्यासमोर आदर्श व्यक्तिमत्व असेल तरच आपण यशाच्या दिशेने जातो. त्यासाठी आजच्या तरुणांनी वाचनाची आवड लावून घेतली पाहिजे, असे सांगितले. पाहुण्यांचा परिचय प्रा. विश्वजीत खाडे यांनी करून दिला. आभार डॉ. रणजीत पाटील यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदिप वाडीकर यांनी केले. डॉ. श्रीनिवास पाटील, डॉ. धनाजी पाटील, डॉ. अमोल कांबळे, डॉ. लखन भोगम, प्रा. मयूर गौड, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

06 DEC 2025 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाला ४ सुवर्णसह २० पदके

## खेल इंडिया युनिर्व्हसिटी गेम्स: ॲथलेटिक्स, कयाकिंगमध्ये नेत्रदीपक कामगिरी

**जनप्रवास : कोल्हापूर**

जयपूर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी चार सुवर्णपदकांसह एकूण वीस पदके प्राप्त केली. यामध्ये तीन रौप्य आणि १३ कांस्य पदकांचा समावेश आहे. कयाकिंगमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

ॲथलेटिक्समध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. १०० मीटरमध्ये सुवर्णपदक मिळवून ऋषी प्रसाद देसाई याने दमदार सुरवात केली, तर प्राची देवकाते हिने ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये सुवर्णपदक मिळवून स्पर्धेची अखेरही सुवर्णमयी केली.







ॲथलेटिक्समध्ये ११० मीटर अडथळा शर्यतीत विकास आनंदा खोडके याने १४.५१ सेकंदाची वेळ नोंदवत रौप्य पदक प्राप्त केले. तर, ८०० मीटर धावण्यात रिया पाटीलने कांस्यपदक प्राप्त केले.

कयाकिंग व कनोईंग प्रकारात विद्यापीठाच्या खेळाडूंनी पाच कांस्यपदके मिळविली. कनोईंगमध्ये वैयक्तिक गटात १००० मीटर सी-वन प्रकारात प्रिया मारुती चव्हाण हिने कांस्यपदक पटकावले.

विद्यापीठाच्या चमूने चार कांस्यपदके पटकावली. कयाकिंग के-फोर १००० मीटर महिला संघाने कांस्यपदक पटकावले. या संघात आरती जाधव, निकिता मगदूम, सुहाना जमादार आणि प्रणाली कोपर्डे होत्या. याच संघाने के-फोर २०० मीटर महिला गटातही कांस्यपदक मिळवले. के-फोर ५०० मीटर महिला गटात कांस्यपदक पटकावणाऱ्या संघात ऋतुजा पाटील, आरती जाधव, निकिता मगदूम व सुहाना जमादार होत्या. के-फोर २०० मीटर पुरुष गटात कांस्यपदक मिळवून देणाऱ्या संघात करण घुणके, स्वानंद अक्कीवाटे, अमेय भुयेकर आणि श्रीसमर्थ सासणे होते.

0 6 DEC 2025
सकाळ

# खेलो इंडिया स्पर्धेत विद्यापीठाला २० पदके



प्राची देवकाते

कोल्हापूर, ता. ५ : जयपूर येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया विद्यापीठ गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी चार सुवर्णांसह २० पदकांची कमाई केली. यात तीन रौप्य आणि १३ ब्राँझपदकांचा समावेश आहे.

या स्पर्धेत ॲथलेटिक्समध्ये १०० मीटरमध्ये ऋषी देसाईने सुवर्ण, तर प्राची देवकातेने ३ हजार मीटर स्टीपल चेसमध्ये सुवर्णपदक मिळवले. ॲथलेटिक्समध्ये ११० मीटर अडथळा शर्यतीत विकास खोडकेने १४.५१ सेकंद नोंदवत ब्राँझ मिळवले. ८०० मीटर धावण्यात रिया पाटील हिने ब्राँझ मिळवले. कयाकिंग व कनोईंगमध्ये संघाने पाच ब्राँझपदके मिळवली. कनोईंगमध्ये वैयक्तिक गटात एक हजार मीटर सी-वन प्रकारात प्रिया चव्हाण हिने ब्राँझपदक मिळवले. कयाकिंग प्रकारात विद्यापीठाच्या संघाने चार ब्राँझ पदके मिळवली. कयाकिंग के-फोर १००० मीटर महिला संघाने ब्राँझ पदक पटकावले. या संघात आरती जाधव, निकिता मगदूम, सुहाना जमादार, प्रणाली कोपडे यांचा समावेश होता. दोनशे मीटर के फोर गटात पुरुषांनी ब्राँझ पदक मिळवले.

06 DEC 2025
सकाळ

# खेलो इंडिया स्पर्धेसाठी सुहाना जमादारची निवड



कागल, ता. ५ : जयपूर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्ससाठी डी. आर. माने महाविद्यालयाची खेळाडू सुहाना शमुद्दिन जमादार हिची शिवाजी विद्यापीठ कयाकिंग महिला संघात निवड झाली. सुहाना सांघिक कयाकिंग के-४ क्रीडा प्रकारात २०० मी. व १००० मी. स्पर्धेत सहभागी होणार आहे. गेल्या वर्षी अखिल भारतीय कयाकिंग स्पर्धेमध्ये सुहानाने ब्राँझपदक पटकावले होते.

06 DEC 2025

तरुण भारत

# 'युनिव्हर्सिटी गेम'मध्ये रिया हिचे यश

कोल्हापूर : राजस्थान येथे झालेल्या पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम अॅथलेटिक्स स्पर्धेमध्ये येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या रिया नितीन पाटीलने ८०० मीटर धावणे



प्रकारात कांस्यपदक मिळवले. रिया पाटील ही महाविद्यालयात एम.सी.सी. कॉम्प्युटर सायन्सच्या प्रथम वर्षात शिकत आहे. या यशासाठी तिला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, एस. के. धनवडे, सुरेश चरापले, आई आणि वडिलांचे मार्गदर्शन लाभले.

0 6 DEC 2025

पुण्यनगरी

# ‘खेलो इंडिया ’मध्ये रिया पाटीलचे यश



**कोल्हापूर :** राजस्थान येथे झालेल्या ५ व्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स भाग १ मध्ये शिकणारी विद्यार्थिनी रिया पाटील हिने ८०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये कास्यपदक मिळवले. यशस्वी खेळाडूला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.